Har Ghar Jal
Jal Jeevan Mission

# राज्य पाणी व स्वच्छता मिशन
## (SWSM)

१ ला मजला, सिडको भवन (दक्षिण कक्ष),
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई-४००६१४
दूरध्वनी क्र. ०२२-२७५६२५४६, २७५६२३६३ ईमेल : iecwsso@gmail.com

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर


पत्र क्र.रा.पा.व स्व. मि./०९२०/प्र.क्र.- ०१/ जा. क्र.ऽ१७ / २०२०

दिनांक:-१०/०९/२०२०

प्रती,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद,..... सर्व

**विषय:** राज्य पाणी व स्वच्छता मिशन साठी बोधचिन्ह (Logo) व बोधवाक्य स्पर्धेचे आयोजन करणे बाबत

**संदर्भ:** पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग शासन निर्णय क्र. जजीमि-२०१९/प्र.क्र.१३८/पा.पु.१०(०७)/दिनांक ४ सप्टे. २०२०

पाणी पुरवठा पुरवठा व स्वच्छता विभागाने राज्य पाणी व स्वच्छता मिशन च्या अंमलबजावणीकरितामार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.. या मिशन साठी ग्रामीण पाणी पुरवठा आणि ग्रामीण स्वच्छता या विषयाच्या अनुषंगाने बोधचिन्ह तयार करण्यासाठी राज्यात बोधचिन्ह स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेत आपल्या जिल्ह्यातून जास्तीत जास्त सहभाग मिळावा म्हणून स्थानिक पातळीवर या स्पर्धेची व्यापक प्रसिद्धी करण्यात यावी.

स्पर्धेची सर्वसाधारण नियमावली :

- लोगो ग्रामीण पाणी पुरवठा आणि ग्रामीण स्वच्छता या विषयांचा सहज बोध होईल असा असावा. ब्रिदवाक्य मराठीतूनच असणे बंधनकारक असेल. ब्रिदवाक्य मोजक्या शब्द मर्यादेत असावे.
- या स्पर्धेत व्यक्ती, संस्था, जाहिरात संस्था सहभागी होऊ शकतील.
- बोधचिन्ह (लोगो) एकरंगी, बहुरंगी प्रकारात असला तरी चालेल.

Scanned with CamSca

- सहभागींनी लोगोची Soft Copy पाठविणे आवश्यक असेल. त्यासोबत स्पर्धकाची संपूर्ण माहिती उदा. पत्ता, संपर्क क्रमांक इ. असणे आवश्यक असेल.
- ज्या स्पर्धकाचा लोगो अंतिम निवड होईल त्यांनी cdr (Coral Draw) फाइल्स उपलब्ध करून देणे आवश्यक असेल.
- लोगो अंतिम करण्याचे संपूर्ण अधिकार राज्य पाणी व स्वच्छता मिशन ला असतील.
- स्पर्धेतील सहभागींनी लोगोची Soft Copy विभागाच्या directorwsso@gmail.com आणि iecwsso@gmail.com या मेल id वर पाठविण्यात यावी.
- ज्या बोधचिन्ह आणि बोधवाक्य यांची अंतिम निवड होईल त्यांना रुपये ५० हजार एवढी रक्कम बक्षीस स्वरुपात देण्यात येईल.
- दिनांक ३० सप्टेंबर २०२० रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत पर्यंत सर्व जिल्ह्यातून प्रवेशिका राज्यस्तरावर प्राप्त होतील याची खबरदारी घेण्यात यावी.

उपरोक्त नियमावलीप्रमाणे आपल्या जिल्ह्यातून या स्पर्धेला भरभरून प्रतिसाद मिळावा यासाठी आपल्या जिल्ह्यातील कलाकार, विद्यार्थी, विविध प्रकारच्या संस्था यांच्यापर्यंत हि स्पर्धा पोहोचविण्याकरिता स्थानिक माध्यमातून व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या सर्व सहभागींना प्रवेशिका पाठविण्यासाठी उपरोक्त उल्लेखित इमेल आयडी कळवावेत. आपल्या अधिनस्त जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन मधील संबधितांना याबाबत आपल्या स्तरावरून तात्काळ निर्देश द्यावेत, हि विनंती.

11/9/2020

**(आर. विमला)**
**अभियान संचालक**
**राज्य पाणी व स्वच्छता मिशन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

**प्रत माहितीस्तव:**

**मा. अपर मुख्य सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई.**
**मा. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, सर्व**

Scanned with CamSca